सूचना का अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ- २०१९/तक्रार क्र. बीएम- ७३/०१**

**तक्रारकर्ता श्री. नंदकुमार मोतीराम वडनेरे**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा प्र.सह जिल्हा निबंधक वर्ग-२,**
(अभिलेख विभाग), मुंबई यांचे कार्यालय, जुने जकात घर,
तळमजला, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई -४०० ०२३.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१ (उ.श्रे.) मुंबई शहर**
सह जिल्हा निबंधक वर्ग-१ मुंबई यांचे कार्यालय, जुने जकात घर,
तळमजला, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई -४०० ०२३.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : ०१.०७.२०२४**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | अनुपस्थित (तक्रारकर्त्याची नोटीस पोस्टाने परत.) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. MHSICMU/२०१८/M/००४०५१ प्रकरणी आयोगाने दि.१९.१२.२०१९ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

*"जन माहिती अधिकारी यांनी दस्त क्र. ३६११/१९२३ चा अभिलेख शोधून किंवा पुनर्गठित करुन त्याची प्रत अपिलार्थींना दि. ३१.०१.२०१९ पर्यंत विनामुल्य द्यावी. या आदेशासह अपील मान्य करुन निकाली काढण्यात येत आहे."*

उक्त आदेशाच्या अनुषंगाने तक्रारकर्ता यांना माहिती न मिळाल्याने त्यांनी दि. ०४.०२.२०१९ रोजी आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला. सदर तक्रारीवर जन माहिती अधिकारी यांच्याकडून आयोगाने दि.१५.०४.२०१९ च्या पत्रान्वये अहवाल मागविण्यात आला. जन माहिती अधिकारी यांनी दि.२४.०४.२०१९ च्या पत्रानुसार आयोगास अहवाल सादर केला की, अभिलेखात शोध घेतला असता दस्त क्र. ३६११/१९२३ या दस्ताच्या कार्यालयीन प्रतीचा अद्याप आढळ झालेला नाही. याबाबत तक्रारकर्ता यांना दि. २२.०४.२०१९ अन्वये कळविलेले आहे.

सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी असे सादर केले की, अजूनही सदर दस्त क्र. ३६११/१९२३ कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध होत नाही.

जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्त्यांना विचारणा करावी की, त्यांच्याकडे दस्तावेज उपलब्ध आहे का? तक्रारकर्ता यांनी दस्तावेज उपलब्ध करुन दिल्यास जन माहिती अधिकारी यांनी मा. नोंदणी महानिरीक्षण तथा मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयीन परिपत्रकाप्रमाणे दस्तावेज पुनर्गठीत करण्याची कार्यवाही करावी.

..२/-

या तक्रारीसंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१) जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनानुसार कार्यवाही करावी.**

**२) तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission, Greater Mumbai

सत्यमेव जयते

2-7-2024

**मुंबई**
**दिनांक : ०२.०७.२०२४**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ